# श्री सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव

## ई- कचरा संकलन केंद्र

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे श्री सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव येथे ई कचरा संकलन केंद्राचे उद्‌घाटन आज दिनांक 26 जानेवारी 2025 प्रजासत्ताक दिनानिमित्त करण्यात आले. या उद्‌घाटन प्रसंगी आवर्जून केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा स्थानिक व्यवस्था मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

उद्‌घाटन सोहळ्यात सिद्धेश्वर संकुलाचे पालक, तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य आदरणीय प्रकाशजी दुगड यांनी त्यांच्याकडील बंद पडला सीपीयू ई कचरा म्हणून डोनेट केला व केंद्रीय कार्यकारणी सदस्य आदरणीय अमरनाथजी खुरपे यांनी त्यांच्याकडील मॉनिटर डोनेट केले. स्थानिक संकुलाचे अध्यक्ष आदरणीय सुरेंद्रजी रेहदासनी यांनी त्यांच्याकडील कीबोर्ड व माऊस डोनेट केले, तथा कार्यवाह आदरणीय विश्वासजी जोशी यांनी त्यांच्याकडील सीडी ड्राईव्ह डोनेट केले, आदरणीय प्राचार्य प्रोफेसर डॉ. मुकुंद देवर्षी सर यांनी त्यांच्याकडील कीबोर्ड व काही सीडीज डोनेट केल्या, असे विविध वस्तू याप्रसंगी सर्वांकडून स्वीकारण्यात आल्या. विद्यार्थी व प्राध्यापकांनी सुद्धा या ई-कचरा संकलन अभियानामध्ये हिरिरिने भाग घेऊन त्यांच्याकडील ई-कचरा महाविद्यालयामध्ये आणून दिल्या.



# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या वतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित

# ई -कचरा संकलन अभियान

माजलगाव -येथील भा शि प्र संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून अभिनव ई -कचरा संकलन अभियान राबविण्यात येत आहे.या मध्ये आपण मोबाईल, चार्जर,सीडी, टेप रेकॉर्डर,स्कॅनर,मिक्सर,ग्राइंडर, प्रिंटर इ. इलेक्ट्रॉनिक वेस्ट देऊ शकता.अभियानाची वेळ- सकाळी १०:०० वाजता आहे.ई - यंत्रण २०२५ आपल्या शहरात होत आहे, यात पर्यावरण रक्षणासाठी शहरांमधील नागरिकांना आवाहन आहे की, जास्तीत जास्त संख्येनी ई-कचरा नजीकच्या संकलन केंद्रांवर आणून द्यावा आणि सुयोग्य कचरा व्यवस्थापनाला चालना देत पर्यावरण संवर्धनात आपला वाटा उचलावा असे आवाहन प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, उपक्रम प्रमुख डॉ शिवशंकर मिटकरी, प्रा. रत्नदीप शिंगे यांनी केले आहे.




ई-कचरा संकलन केंद्र

ई-कचरा संकलन केंद्र

ई-कचरा संकलन केंद्र

ई-कचरा संकलन केंद्र

ई-कचरा संकलन केंद्र

ई-कचरा संकलन केंद्र

ई-कचरा संकलन केंद्र

ई-कचरा संकलन केंद्र

ई-कचरा संकलन केंद्र